# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २६/०६/२००८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २६/०६/२००८ रोजी सभा सुचना क्र. ०५ दि. २१/०६/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ८) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| ११) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| १२) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १३) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १४) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १५) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १६) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**उपस्थित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. संभाजी पानपट्टे | -- | उपायुक्त, आरोग्य विभाग |
| २) | श्री. ओमप्रकाश दिवटे | -- | उपायुक्त अतिक्रमण |
| ३) | श्री. दादासाहेब आ. पाटील | -- | मुख्य लेखापरिक्षक |
| ४) | श्री. श्रीकांत मोरे | -- | मुख्य लेखाधिकारी |
| ५) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता, सार्व बांधकाम |
| ६) | श्री. अजित पाटील | -- | कर निर्धारक व संकलक |
| ७) | श्री. दिपक खांबित | -- | कार्यकारी अभियंता, सार्व. बाधकाम विभाग |
| ८) | श्री. स्वप्नील सावंत | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३ |
| ९) | श्री. संजय दोंदे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २ |
| १०) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ११) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, जाहिरात |
| १२) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| १३) | श्री. बाबुराव वाघ | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| १४) | श्री. गोविंद परब | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| १५) | श्री. राजकुमार कांबळे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १६) | डॉ. लहाने | -- | आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |
| १७) | श्री. रामचंद्र असोदेकर | -- | विभाग प्रमुख, सुवर्ण जयंती |
| १८) | श्री. दादासाहेब खेत्रे | -- | विभाग प्रमुख, जकात |
| १९) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| २०) | श्री. राजकुमार घरत | -- | सिस्टीम ॲनालिस्ट, नागरी सुविधा केंद्र |
| २१) | श्री. नागेश इरकर | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |
| २२) | श्रीम. चारुशिला खरपडे | -- | विभाग प्रमुख, आस्थापना |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बालाजी खतगावकर | -- | उपायुक्त (मु.) |
| २) | श्री. भारत जगताप | -- | सहा. नगररचनाकार |
| ३) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ४) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |
| ५) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| ६) | श्री. हेमंत पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| ७) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| ८) | श्री. सोनार | -- | प्रशासन अधिकारी, शिक्षण |
| ९) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १०) | श्री. सुनिल यादव | -- | चौकशी अधिकारी |
| ११) | सौ. सई वडके | -- | विधी अधिकारी |

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेला सुरूवात करावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**दिनांक :- २१/०६/२००८.**

**मा. स्थायी समिती सभा**

**सभा सूचना क्र. :- ०५, दिनांक २१/०६/२००८**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीम.** ------------------------------------------------

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. २६/०६/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०५, दि. २१/०६/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मागील सभांचे इतिवृत्तांत, दि. २९/०२/२००८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत प्रिंटींग खराब असल्यामुळे आम्ही दिलेले नाही. पुढच्या सभेत देउ त्यावेळी हा विषय परत घेण्यात येईल. मध्यप्रश्न - निरंक.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, याच्यामध्ये एक सुचना आहे. मागच्या वेळेला असेच झाले. मा. महासभेला आणि मा. स्थायी समिती सभेला आम्हाला अनरिडेबल इतिवृत्तांत मिळते. तुमच्याकडे तुमच्या किती झेरॉक्स मशिन खराब आहेत. आणि आम्हाला असे का येते? नविन झेरॉक्स मशिन आणायला तुम्हाला कोणी बंधन घातले आहे का? की, बजेटमध्ये प्रोव्हीजन नाही. साहेब, दरवेळेला भिकमागे धंदे असतात. आपल्या झेरॉक्स मशिन जर बाद झाल्या असतील तर तुम्ही त्या सेकन्ड हॅन्डमध्ये विकून टाका आणि नविन चांगल्या घ्या. साहेब, याच्यावर अभ्यास करण्यासाठी तुम्ही आम्हाला आठवडा अगोदर किंवा पंधरा दिवस अगोदर वाचण्याकरिता देता. त्यांच्या कॉपी जास्त असतील. पण जी काही कॅपेसिटी असेल तर त्या मशिन नवीन घ्या. साहेब, तीन वर्षापासुन हा प्रकार चालू आहे.

(मा. सभापतींच्या आदेशान्वये सदरचे प्रकरण तहकुब करण्यात आले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २३, मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन विभाग बाजार लिलाव (१२ महिन्यांच्या कालावधीकरीता) बोली रक्कम स्विकारणेस मंजुरी देणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, या विषयावर थोडे बोलायचे आहे. मा. आयुक्त साहेब, आत्ता जी रक्कम आलेली आहे. ही नक्कीच जास्त आहे यात दुमत नाही. पण बाकीच्या कामाच्यावेळी प्रशासन जेव्हा टिपणी देते की, इकडे गटार बांधणे जरूरी आहे. वस्ती वाढलेली आहे. इकडे हे करणे जरूरी आहे हे वाढलेले आहे. आपण जेव्हा मिरारोडचा ठेका लिलावाला काढला त्यावेळी त्याचे रस्ते वाढले हद्द वाढली त्यावेळी तो कॅल्क्युलेशन

नाही. फक्त मागच्या १० टक्के ने वाढवून तुम्ही बोली बोलले. पण बाकीच्या गोष्टीमध्ये आपण सर्व सांगतो. जेव्हा प्रशासनाच्या उत्पन्नाची बाब आहे. त्यावेळी काही नवीन रस्ते झालेले आहेत. त्याची रक्कम याच्यात का धरली नाही? म्हणून प्रत्येक वेळी प्रशासनाला हे सांगा. मागची १० टक्के ने वाढ ठिक आहे. तुम्ही ते घेतलेले आहे. त्याच्यापेक्षा दोन लाख जास्त आलेले आहेत. पण एवढे शहर वाढत असताना तुम्ही बाकीच्या गोष्टीमध्ये टिपणी देताना हे करणे जरूरी आहे. कारण एवढी लोकसंख्या वाढली मग यामध्ये का वाढ झाली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आणखिन एका प्रश्नाचे उत्तर द्या. मागे भाईंदर वेस्ट आणि इस्टचे टेंडर जेव्हा कॉल झाले होते. त्यावेळी जी अमाउन्ट होती. ही खुपच जवळ जवळ पंधरा ते वीस हजार, वाढ झाली होती आणि हा मिरा रोड ते चेना हा एरिया पण वाढलेला आहे आणि याची जी अमाउन्ट आहे ८५,६२,०००/- आणि वाढ झाली फक्त ८६,००,०००/- तर त्याच्यामध्ये मला तरी वाटते की, आमाउन्ट कमी आलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

मी सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो की, हा हरास माझ्यासमोर झाला. त्या हरासेच्या वेळेस स्वतः चेअरमन साहेब होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी सुद्धा त्यावेळी उपस्थित होतो.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, हे बरोबर आहे. जे झाले ते योग्य आहे. त्याला आम्ही विरोध करत नाही. पण सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांनी जो मुद्दा मांडला की, शहरात जो खर्च करायचा तो आपण करतो. रस्ते वाढले म्हणून रस्त्याचा खर्च करायला पाहिजे. एखादी वस्ती वाढली म्हणून तिथे गटार बांधायला पाहिजे. आणि जेव्हा आपण बाजार लिलाव देतो तेव्हा जे रस्ते वाढले त्याच्यावर नविन फेरीवाले बसायला लागलेले आहेत. आणि मग त्याचापण अभ्यास करून घ्यायला पाहिजे. अधिकारी वर्गाने त्याचा अभ्यास करायला पाहिजे की, इकडे रस्ते वाढले आहेत. मग आपले उत्पन्न वाढायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

त्याला मार्ग असा आहे की, आपण यापुढे मुर्धा ते चेना किंवा सगळे गाव एकत्र करायचे आणि असे करायचे योग्य नाही. रस्ते निहाय एक यादी करून तेवढ्यापुरता हरास काढायला पाहिजे. म्हणजे त्याच्या व्यतिरिक्त काही वाढीव रस्ते असतील तर त्याचा ॲडीशनल हरास होईल. किंवा ते दुस-या वर्षी त्यात ॲड होतील. त्यामुळे तुम्ही ते, मिरारोड ते चेना एक भाग करणे, भाईंदर ईस्ट कम्प्लीट एक करणे, भाईंदर (वेस्ट) कम्प्लीट एक करणे, मुर्धा ते उत्तन एक करणे असा प्रकार न करता रोड निहाय करा. आत्ता यावर्षी ते शक्य आहे असे मला वाटत नाही. पण यापुढे ही सुचना चांगली आहे. त्याच्याप्रमाणे पैसे वाढत असतील तर असा दोन दोन, चार चार रोडचा एक बंच करून तो हरासीला ठेवला तर जास्त पैसे मिळतील.

**शरद पाटील :-**

आणि अटीशर्तीमध्ये असे नमुद करा की, जे ना. फेरीवाला क्षेत्र आहेत. तिथून त्याने वसुली करू नये.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ना. फेरीवाला क्षेत्रामध्ये जे फेरीवाले बसतात त्यांचे काय?

**शरद पाटील :-**

त्याची वसुली महापालिका करेल.

**मा. आयुक्त :-**

तो आपला युनिवर्सल विषय आहे. आपण तो दरवेळेला काढतो. त्यासाठी आपण १ जुलैपर्यंत थांबा. १ जुलै नंतर २ किंवा ३ जुलैपासुन आपण जशी नालेसफाई युद्धपातळीवर घेतली तशी ऑर्गनाईज शहराची सफाई सुद्धा घेणार आहोत. त्या शहराच्या सफाईच्या वेळेस आपण हाही कम्पोनन्ट....

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, जिथे ना फेरीवालाचा बोर्ड लावलेला आहे. त्याच्याखाली आपला फेरीवाला बसला आहे. ही किती शरमेची बाब आहे. साहेब, आम्हाला लाज वाटते.

**शरद पाटील :-**

साहेब, हा फार वादग्रस्त विषय आहे.

**मा. आयुक्त :-**

हे फक्त एक दिवसाचे काम आहे. त्याला उचलून फेकायला फार वेळ लागणार नाही.

**शरद पाटील :-**

साहेब, हे एक दिवसाचे काम नाही. हा फार सेनसेटीव्ह विषय आहे. जेव्हा फेरीवाल्यांना उचलतात त्याच्यानंतर नगरसेवक बदनाम होतो. कारण जेव्हा उचलायला जातात तेव्हा दोन दिवस उचलतात. तिस-या दिवशी उचलत नाही. फेरीवाला सरळ सरळ बोलतो की, क्या करेगा, महापालिका हमारे जेब मे है। या पद्धतीचे भाष्य असते. त्याच्यात बदनामी नगरसेवकांची होते. अधिका-यांची होते की नाही हे माहिती नाही. पण नगरसेवकांची शंभर टक्के बदनामी होते. एकदा जे घेतलेले कार्य आहे ते पुर्ण करायला पाहिजे. आज दोन्ही

बाजुने बसायला लागले. आमची गाडी जिथुन टर्न मारते त्या रोडवर एक फालूदा वाला बसतो. त्याला दोनदा बोललो तो उठत नाही. मग मी बोललो जाउ द्या. कशाला रोज बोला. लोक ऐकतात. मी उठव सांगतो म्हणजे काहीतरी हफ्ता मागणारा आहे अशी लोकांची धारणा होते. का उचलत नाही? रोडच्या मधोमध तो संध्याकाळचा उभा असतो.

**मा. आयुक्त :-**

गेल्या दोन महिन्यापासुन मी ज्या सभा अटेंड केल्या. प्रत्येक ठिकाणी सर्व सभासदांनी हाच मुद्दा उपस्थित केला आहे. त्यामुळे सर्व सदस्य मी फार खुश आहे, उलट असते, इथे उलटे आहे. सर्व सदस्य त्या मताचे आहेत त्यामुळे आपण ही चांगली मोहिम राबवू शकतो एवढेच मी सांगतो.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, आता बाजार लिलावाचा विषय आला.पण जो माणूस डोक्यावर टोपली घेउन फिरतो. त्याच्याकडून पण ते पैसे वसुल करायचे का? कारण साहेब, आमच्याकडे तशा तक्रारी नेहमी येतात. जो मुलगा पैसे् वसुल करतो. त्याला आम्ही सांगितले की, त्याच्याकडून घेउ नको. तर तो सरळ ठेकेदाराला फोन करतो. आणि तो ठेकेदार त्याला बोलतो की, वसुल करायचे. मी आहे तु कशाला घाबरतो. म्हणजे तिकडे एखाद्या वेळेला झटापटीचा विषय येतो. तसा यायला नाही पाहिजे. साहेब, दुसरा विषय आंबेडकर नगर येथे मेन रोडला संध्याकाळच्या वेळेला एवढे भाजीवाले, कपडे विकणारे व मच्छिवाले बसतात. त्या बाजुने बस आली किंवा या बाजुने बस आली किंवा दोन्ही बाजुने गाड्या आल्या तर गाडीवाल्यांची पंचाईत होते. तर तो बाजार तिकडून ताबडतोब उचलावा. कारण तो बाजारवसुली वाला असे बोलतो की, मी महानगरपालिकेला पैसे भरतो, मी वसुली करणारच. पण साहेब, ज्यावेळेला आपले अतिक्रमणाचे लोक जाउन बाजार उचलतील. त्यावेळेला पैसे वसुलीचा प्रश्न तिकडे येणार नाही. तो तिकडून ताबडतोब उचलण्यात यावा.

**मा. आयुक्त :-**

मॅडम आता प्रश्न असा आहे की, आपण मुर्धा ते उत्तन म्हटल्यानंतर याच्यात सगळे बाजार आले. आपण एका बाजुला हरास करतो आणि एका बाजुला बंद करा म्हणून सांगतो. असे कसे चालेल.

**नयना म्हात्रे :-**

पण तिकडे बसु शकतात का? ती बाजाराची जागा आहे का? आपण तिकडे बसवू शकतो का?

**मा. आयुक्त :-**

आपल्या इनकम वर इफेक्ट न होता ते उचलता येत असेल तर ते उचला. आणि त्यांचे दुसरे स्पष्टीकरण करा की, डोक्यावरून.....

**नयना म्हात्रे :-**

डोक्यावर टोपल्या घेउन विकतात. त्याच्याकडून पैसे् वसुल करायचे का?

**अजित पाटील :-**

जागेवर बसतात त्यांच्याकडून पैसे घ्यायचे. त्यांनी जागा व्यापली तर त्यांच्याकडून पैसे घ्यायचे. फेरीवाल्यांकडून घ्यायचे नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

मग तुम्ही ठेकेदारांना तसे लेखी कळवा.

**मा. आयुक्त :-**

फेरीवाल्यांकडून घ्यायचे नाहीत.

**नयना म्हात्रे :-**

डोक्यावर घेउन फिरत असेल त्याच्याकडून घ्यायचे नाहीत.

**मा. आयुक्त :-**

पण तो तुमच्याच रस्त्यावरून चालतो ना?

**मिलन म्हात्रे :-**

श्री. पाटील साहेब, फेरीवाल्यांचा अर्थ माहिती आहे का? त्याच्या शब्दातच तो अर्थ दडला आहे. फेरी आणि वाला. जो फेरी मारतो तो.

**अजित पाटील :-**

त्याने जागेवर बसले पाहिजे ना.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, जागवेर बसतात, त्याच्याकडून आपण वसुल करू शकतो.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. त्याच्यामध्ये सुप्रिम कोर्टाचे पण एक जजमेंट आहे की, फेरीवाल्याचे डेफिनेशन काय आहे? ते काढून बघा. फेरीवाले म्हणजे जो माणूस मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत व्यापार, व्यवसाय जसा काय करत असेल. साहेब, उद्या मी सायकल वर चालेन. आणि धंदा करत राहिन. मी हातगाडी घेउन चालत राहीन. सुप्रिम कोर्टाच्या जजमेंटमध्ये फेरीवाल्याचे डेफिनेशन असे आहे की जो चालता फिरता व्यवसाय करतो तो फेरीवाला.

**मा. आयुक्त :-**

म्हणूनच मी सांगू इच्छितो की, आपण जर हे असे फिरतात त्यांच्याकडून पैसे वसुल करायचे नाहीत असे ठरवले तर सगळेच फिरतील मग पैसे कोणाकडून वसुल करायचे?

**तुळशीदास म्हात्रे :-**

श्री. अजित पाटील, आणखिन एक गोष्ट सांगा की, सकाळी एकदा घेतले जातात. परत संध्याकाळी पण घेतात.

**मिलन म्हात्रे :-**

ते बरोबर आहे. एक काहीतरी घ्या.

**अजित पाटील :-**

एकदाच घ्यायचे. दुसऱ्या वेळेला घ्यायचे नाहीत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मग ते डबल का घेतात.

**अजित पाटील :-**

एका जागेवर बसला असेल तर त्याने एकदाच द्यायचे. दुसऱ्या जागेवर बसला तर त्याला भरावे लागतील. कारण सकाळी ईस्टला बसतो आणि संध्याकाळी वेस्टला येतो त्याला भरावे लागतील.

**तुळशीदास म्हात्रे :-**

त्याला भरावे लागू द्या. पण तो त्या जागेवर बसलेलाच आहे....

**शानु गोहिल :-**

श्री. अजित पाटील साहेब, कुछ जगह पर ऐसा है की, कही पंधरा रूपया लेते है। कही दस रूपया लेते है। कही बीस रूपया लेते है। तो इसका क्या सिस्टम है?

**अजित पाटील :-**

आपला एरिया फिक्स आहे. एका स्क्वेअर मीटरला दहा रूपये घ्यायचे. त्याच्यावर असेल तर वीस रूपये घ्यायचे. असे नियम आपण फिक्स करून दिलेले आहेत.

**शानु गोहिल :-**

इसके बावजूद भी वो वैसा इम्प्लिमेंट करते नही है। आमच्याकडे प्रुफ आहे. माझ्याकडे तक्रारी आहेत. मी तुम्हाला देते.

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, मिरा रोडला सोमावरी जो सोमवार बाजार भरतो, सगळ्या नगरसेवकांची भावना आहे की, त्या लोकांनी तिथे बसू नये. अजुनपर्यंत कार्यवाही का होत नाही? कधीपासुन आम्ही पत्र लिहितो. सगळ्या पक्षाच्या नगरसेवकांचा त्याला विरोध आहे. लोकांचा विरोध आहे.

**मा. आयुक्त :-**

शनिवार बाजार असेल किंवा सोमवार बाजार असेल, दोन्ही बाजारांचा आपण या सर्व हॉकर्स बरोबर विचार करून एकच कार्यवाही करू.

**प्रशांत पालांडे :-**

पण साहेब, आत्ता साध्या पण तिथे एखाद्या बिल्डींगमध्ये कोणी आजारी असेल...

**एस. ए. खान :-**

हा विषय वेगळा आहे. जो सोमवार आणि शनिवार बाजार आहे. त्यामुळे लोकांना किती त्रास आहे.

**मा. आयुक्त :-**

श्री. पाटील साहेब, मी समजतो की, सोमवार आणि शनिवार बाजार या हरासीमध्ये नाही. आत्ता आपण निर्णय घेउन टाकू की, या सोमावारी तिथे कोण उभे करायचे की, अभी निकल जाओ म्हणून सांगायला.

**एस. ए. खान :-**

पोलिसांची मदत घेउ.

**मा. आयुक्त :-**

आपण आपलीच सात आठ लोकांची टिम बसवू.

**एस. ए. खान :-**

आपले वॉचमेन असतील.

**मा. आयुक्त :-**

आपण एक बोर्ड लावू. तिथे वॉर्ड ऑफिसरसह एक पथक सकाळी तीन चार तास थांबेल आणि पहिल्या सोमवारी त्यांना डिस्करेज करू. फारच आले की, इस बार बैठने दो, अगली बार नही आयेंगे। पहिल्या सोमवारी मॅसेज देउ की, पुढच्या सोमवारी यायचे नाही आणि पुढच्या सोमवारी जे येतील त्यांना परत पाठवू आणि त्याच्या पुढच्या सोमवारी, तिसऱ्या सोमवारी एकदम चकचकीत झाले पाहिजे हे बघू.

**नयना म्हात्रे :-**

मा. आयुक्त साीब, मी जे आंबेडकर नगरचे बोलले. तिथे दोन्ही बाजून गाडी आली आणि गाडीखाली कोण आले तर त्याला जबाबदार कोण? मेनरोडवर बसतात.

**शरद पाटील :-**

साहेब, दोन्हींचे उत्तर एकदाच द्या. एकतर उत्तनची अशी परिस्थती आहे की, आपले जे महापालिकेचे मार्केट आहे. त्याच्यातून सुध्दा फेरिवाल्यांकडून ठेकेदार पैसे वसुल करतो. ते त्यांनी करायला नाही पाहिजे. आम्ही विचारले असता श्री. अजित पाटील साहेबांनी सांगितले की, आम्ही तिथे एक नोटीस लावलेली आहे की, ठेकेदारांनी त्यांच्याकडून पैसे वसुल करु नये. तरीसुध्दा अजून वसुली करतात. तर त्यांच्यावर काय कार्यवाही केली जाईल?

**मा. आयुक्त :-**

हा विषय मा. महासभेमध्येसुध्दा काढला होता. तर जे लोक आपल्याला ऑलरेडी पैसे देतात ते तिकडे फेरिवाल्यांना पैसे कसे काय देतात?

**अजित पाटील :-**

आपण बोर्डावर जाहिर नोटीस लावलेली आहे.

**शरद पाटील :-**

ज्यांनी केले त्यांच्यावर काय कार्यवाही करणार?

**अजित पाटील :-**

पब्लिकला द्यायचे नाही म्हणून सांगितले आणि ठेकेदारापण नोटीस दिली.

**नयना म्हात्रे :-**

श्री. अजित पाटील साहेब, आंबेडकर नगरला बाजार बसतो त्याचे काय? त्याचे मला उत्तर द्या.

**अजित पाटील :-**

फेरिवाला पथक आहे, त्यांना हलवायला सांगतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. अजित पाटील साहेब, आपल्या भाईंदर शहरामध्ये ना-फेरिवाला झोन आणि फेरिवाला झोन याच्यामध्ये मा. स्थायी समिती आणि मा. महासभा यांच्या ठरावामुळे कॉम्प्लीकेशन निर्माण झाले आहेत. तुम्ही ते साहेबांना सांगितले का? आणि आपल्याला तो विषय परत मा. महासभेमध्ये घ्यायचा आहे.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये मला असे सांगण्यात आले की, भाईंदर (ईस्ट) आणि भाईंदर (वेस्ट)चे फायनल झालेले आहे. मिरारोडचे फायनल होणार आहे. मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली कमिटी आहे. तुम्ही म्हणता तसे तीन-चार ठराव आहेत. ती फाईल मी घेतली आहे. ते सगळे एकत्र करुन एक किंवा दोन तारखेला जी विशेष सभा लागेल त्यामध्ये एखादे निवेदन करता येईल का ते मी बघतो आणि त्याप्रमाणे मग आपण सगळ्या आधीच्या ठरावांचा विचार करुन अंतिमतः जे काही पिक्चर इन्हॉल्व होईल की, आत्ता आपण कुठल्या रोडवरचे हॉकर्स काढणार, कुठल्या रोडवरचे ठेवणार हे आपण एक.....

**मिलन म्हात्रे :-**

पूर्वीचे सगळे ठराव परत घ्यावे लागतील. ते ठराव आपल्या सभागृहातच मागे घेउन एक फायनल ठराव तुमच्या अधिका-यांना द्यावा लागेल.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेत ऐन वेळेस घेता येईल की, नाही हे मला माहिती नाही. कारण आपण तो विषय गोषवा-यात दिलेला नाही. पण जुलैची जी मा. महासभा वीस एकवीस तारखेपर्यंत होईल त्यात तो विषय घेउ आणि मग...

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तीन महिन्यानंतर मॉडीफाय करायचे अधिकार दोन्ही सभागृहाला आहेत.

**मा. आयुक्त :-**

सध्या विषयपत्रिकेवर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

विषयपत्रिकेवर घेउन बाकीचे तीन चार ठराव मॉडीफाय करा आणि एकच फायनल त्यांना देउन टाका. साहेब, मी काही पत्रव्यवहार केला या विषयासंदर्भातच आहे. म्हणजे ते टेंडर्स भलतीकडेचेच आहे. एक तर रविवारचा जो बाजार भरतो. याच्यामध्ये माझे एक असे पत्र होते की, फुटपाथनंतर एक ठराविक चार फुटाचा पट्टा तुम्ही मार्किंग करून द्यायचा, जसे आपण व्हाईट पट्टे मारतो. त्याच्या पलीकडे जो फेरीवाला बसतो त्याला तुमच्या अतिक्रमण पथकाने रविवारीसुद्धा उचलले पाहिजे. आज परिस्थिती अशी आहे आपल्याकडे ॲम्ब्युलन्स आहे किंवा ह्या एवढ्या ठिकाणी उद्या काही दुर्घटना घडली, आपल्याकडे फायरब्रिगेड व सर्व असुनसुद्धा गाड्या येत नाहीत. आमच्याकडे पोलिस स्टेशनसमोर मच्छी मार्केट बसते, सुकी मासळी घेउन बसायला मागे सगळी मोकळी जागा सोडतात आणि पुढे येउन एक सिंगल गाडी पास होउ शकत नाही.

आत्ता आम्ही तिकडे राहतो, तर आमच्या गेटमधून गाडीपण बाहेर काढायला भारी पडते. त्यांचे सगळे पसारे पसरलेले असतात. म्हणजे एक तर रस्ता मोठा आहे. मागे जागा मोकळी असते. ते लोक पुढे येतात. त्याच्यामुळे उत्तन पासुन येणाऱ्या एस.टी. बसेस परिवहनची गाडी, सर्व ट्राफिकला म्हणजे या गाड्यांचे मुद्दाम सांगतो, बाहेरच्या गाड्या बायपास सरळ निघून जातात. त्याच्यावर पत्र देउन त्याच्यावर अजुन कार्यवाही का झाली नाही. माझी सुचना चुकीची असेल तर तुम्ही मला तसे द्या. साठ फुट रोडला आंबेडकर मार्ग आहे, तिथे पण तोच प्रकार आहे. पोलिसस्टेशन वाले म्हणतात की, तुम्ही आम्हाला पट्टा मारून द्या. मग बाहेरचे असेल तर आम्ही काय ते बघतो. कारण त्याच्यामध्येपणे थोडे लॉ ॲन्ड ऑर्डर उत्पन्न होते. आपण आपल्या अधिकाऱ्यांना चार फुटाचा पट्टा मारून दिला, तर त्या ज्या वाकड्या तिकड्या मध्ये उभ्या राहणाऱ्या गाड्या उभ्या राहणार नाहीत. पत्र देउन आत्ता तिन महिने झाले. इकडे सगळे वॉर्ड ऑफिसर उपस्थित आहेत. त्यांना विचारा त्यांनी काय केले? मला उत्तर काही आलेले नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब, आपण एवढी वर्षे या महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून आहात. सर्वांना हाच प्रश्न असतो. आपले भाईंदरच नाही तर पुर्ण मुंबई भागात हे असेच आहे. गोरेगावला एक दिवस बाजार उठवला तरी तो दुसऱ्या दिवशी पुन्हा बसतो. प्रकरण हे चालूच राहणार.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचे गणित बसवायला लागेल.

**मा. सभापती :-**

जोपर्यंत आपण बाजाराचा ठेका देउन कायम बंद करत नाही तोपर्यंत हे चालूच राहणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

असे नाही.

**मा. सभापती :-**

तसेच राहणार आहे. ठेका कशाला घेतात?

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही मुंबईचे सांगा. ग्रॅन्ट रोडला सांगा, गोरेगावला सांगा किंवा बोरीवलीला सांगा. फेरीवाले असतातच.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ठेका दिल्यानंतर शिस्त लावा. मी हे म्हणत नाही की, त्याला उचला किंवा उठवून काढा.

**मा. सभापती :-**

आपण म्हणाल्याप्रमाणे एक दिवस शिस्त लागणार. पण त्याला काय करणार. पंधरा वर्षा पासुन आपण हेच ऐकतो.

**मिलन म्हात्रे :-**

असे सुरूवात तर करा. म्हणजे लोकांनी रस्त्यात मरायचे का? अपघात व्हायचे का? लोकांनी, लहान मुलांनी रस्त्यात मरायचे का? याचा अर्थ असा आहे का?

**नयना म्हात्रे :-**

आत्ता फेरीवाल्यांचा विषय आला म्हणून मी बोलते आता एवढी मोठी मोठी दुकाने आहेत. समजा कोणाचे हॉटेल आहे, कोण भजी करते किंवा काय करते त्यांच्या सगळ्या गॅसच्या चुली आणि कढई आपल्या फुटपाथवर असतात. साहेब, आता लोकांनी कूठून चालायचे, हे मला सांगा. एखाद्या वेळेला ती गरम कढई एखाद्या मुलाच्या किंवा मोठ्या माणसाच्या पायावर पडली तर त्याची काय परिस्थिती होईल हे मला सांगा. तुमच्या अधिकाऱ्यांना पहिल्यांदा ही शिस्त लावायला सांगा की, त्यांचे जे काही सामान असेल ते त्यांनी आतमध्ये ठेवावे.

**मिलन म्हात्रे :-**

त्या राम मंदिर रोडला कोणाचे मयत झाले, ते गावकरी आहेत, तिकडचे स्थानिक आहेत, तिकडे प्रेतयात्रा काढायला भारी पडते. त्यांना एक ऑल्टर दिला की, दोन साईडला फेरीवाले बसतात ते एका साईडला बसा. नसेल तर मागच्या बाजुला मोकळी जागा आहे. तिकडे तो बाजार हलवा आणि तिसरे जो चर्च आणि महानगरपालिकेच्च्या मधला जो रस्ता आहे तिकडे तो बाजार हलवा. साहेब, आम्ही तीन ऑल्टरनेट दिले आहेत. आज मेन रोडवर दररोज म्हणजे दुपारी तीन वाजेपर्यंत तिकडे फेरीवाले असतातच. म्हणजे ती कुठली पालखी असो किंवा जैन धर्मियांच्या किंवा कुठल्याही धर्मियांच्या पदयात्रा किंवा प्रोसेंच्या यात्रा निघतात किंवा प्रेतयात्रा निघतात यांना फार त्रास होतो. पत्र दिलेले आहे. आमची तीन वर्षे सतत मागणी चालू आहे. पण त्याच्यावर काहीच कार्यवाही होत नाही. तो रोड ना. फेरीवाला झोनमध्ये आहे. राममंदिर हा रोड ना फेरीवाला क्षेत्रामध्ये आहे. मग तुम्ही त्याची कार्यवाही काय करता? साहेब ऑल्टर दिले आहेत. मागे जागा तुम्ही फेरी मारून बघा. चर्च आणि महापालिकेच्या मधला जो रोड आहे. तो एक ऑप्शन होउ शकतो. तिकडे रहदारी

नसते. एक तो वापरा. दुसरे मध्ये एक मोकळे मैदान आहे. त्याच्यात सुद्धा तुम्ही बसवू शकता. या महापालिकेच्या जागा आहेत.

**मा. आयुक्त :-**

म्हणूनच मी म्हणतो पुर्ण शहराचा भाजी मार्केट, हॉकर्स, शनिवार बाजार, रविवार बाजार, सोमवार बाजार या सगळ्याचाच आढावा घेण्याची गरज आहे. एकदा सर्व वॉर्ड ऑफिसर आणि आमच्या एच.ओ.डी. सोबत आम्ही दोन तीन तासाची मॅरेथॉन बैठक घेतो. भाईंदर (वेस्ट), भाईंदर (ईस्ट), मिरा रोड हायवे असा एक एक आढावा घेउ. सविस्तर प्रस्ताव तयार करू आणि एकदा मा. महासभेसमोर ठेवू. आणि एकदा ग्रीन सिग्नल घेतला की, त्याप्रमाणे तो फायनल.

**मिलन म्हात्रे :-**

आणि त्यावेळेला त्या आरक्षणाचा पण विचार करा. फेरीवाल्यांना काय पाहिजे. तुम्ही मातीचा भराव करून दिला तरी लोक तिकडे उभे राहून तुम्हाला पैसे देतील. त्यांना मार्केटची गरज नाही. लोकवस्तीमध्ये आरक्षणे आहेत. त्याच्यावर भराव टाकला नाही म्हणून आपण वापर करू शकत नाही. दोनशे - तिनशे - चारशे फेरीवाले जर तिकडे बसले, तर दुसऱ्या मार्केटचे उत्पन्न तुम्हाला सुरू होते.

**मा. आयुक्त :-**

हा आढावा घेताना काय काय ठिकाणी कुठे कुठे त्यांना परत रिसेटल करता येईल याचाही विचार करू. जेणेकरून आपल्याला पैसेही मिळतील आणि आपली रस्त्यावरची गर्दी ही कमी होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, उत्तनच्या मार्केट बद्दल म्हणजे जे भाडे धारक आहेत, गाळेधारक आहेत. त्यांना ग्रामपंचायत काळापासुन भुईभाड्यावर दिले अशी त्यांच्याकडे नोंद आहे. त्यांच्याकडे पावत्या आहेत. आत्ता भुईभाड्या बद्दल अनेकांना नोटीस गेली त्यांना गेलेली नाही. अशा नउ लोकांची यादी आमच्याकडे आहे. १) जेबल डॉमनिक मेंडोसा २) फ्रेडी थॉमस मेंडोन्सा ३) रमेश वसंत अदमाने ४) उदय सिताराम बने ५) मोतीन रोमच बोर्जीस ६) कोमू सिताराम बने यांच्याकडे ग्रामपंचायत काळामध्ये तुम्ही भुईभाड्यावर असतात त्यांना नोटीस द्यायचे, ते पैसे भरायचे. पण आत्ता त्यांना नोटीस गेलेली नाही. म्हणून त्यांचे नाव कसे कमी केले किंवा चुकीने झाले हे जरा तपासुन....

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त सो. यांचा विषयासंदर्भातील गोषवारा वाचन करण्यांत आला.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरा रोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन या विभागाकरीता १२ महिने कालावधीसाठी बाजार फी वसूली करीता अभिकर्ता नेमणे बाबत दि. ०६/०६/२००८ च्या दै. सामना, लोकनायक व आपला महानगर या वृत्तपत्रात बोली पद्धतीने लिलावाची जाहिर नोटीस प्रसिद्ध करुन दि. १६/०६/२००८ रोजी मा. आयुक्त सो. यांचे दालनात खालीलप्रमाणे लिलाव घेण्यांत आले.

**<u>मिरारोड ते चेणा विभाग</u>** **(देकाराची रक्कम रु. ८५,६२,०७०/-)**

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नाव | पुकारलेली बोलीची रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा | ८५,७०,०००/- |
| २ | श्री. अतूल ठाकुर | ८५,७५,०००/- |
| ३ | मे. ललित कंस्ट्रक्शन (श्री. संजय पाटील) | ८५,७७,०००/- |
| ४ | मे. राज कंस्ट्रक्शन (श्री. प्रेम चौहाण) | ८५,७८,०००/- |
| ५ | श्री. शरद दहेरेकर | ८५,९०,०००/- |
| ६ | मे. बैजू कंस्ट्रक्शन (श्री. ब्रायन फोन्सेका) | ८५,९५,०००/- |
| ७ | मे. शिवम इंटरप्रायजेस (श्री. समीर व्ही. साकलकर) | ८५,९८,०००/- |
| ८ | श्री. अनिल काजरोळकर | ८६,००,०००/- |
| ९ | श्री. राजेश तुलसीदास बेलानी | बोली लावली नाही |
| १० | मे. संकल्प ट्रेडींग कंपनी (श्री. अे. आर चौधरी) | बोली लावली नाही |

**<u>मुर्धा ते उत्तन विभाग</u>** **(देकाराची रक्कम रु. ३,३८,८००/-)**

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नाव | पुकारलेली बोलीची रक्कम |
|---|---|---|
| १ | मे. ललित कंस्ट्रशक्शन (श्री. संजय पाटील) | ३,४०,०००/- |
| २ | मे. संकल्प ट्रेडींग कंपनी (श्री. अे. आर. चौधरी) | ३,४१,०००/- |
| ३ | श्री. सायमन अल्मेडा | ३,४२,०००/- |
| ४ | श्री. ललित जूगलकिशोर जोशी | ३,४४,०००/- |
| ५ | मे. शिवशक्ती ट्रान्सपोर्ट (श्री. स. का. आव्हाड) | ३,४५,०००/- |
| ६ | श्री. अनिल काजरोळकर | ३,४६,०००/- |
| ७ | मे. बैजू कंस्ट्रक्शन (श्री. ब्रायन फोन्सेका) | ३,४७,०००/- |

वरीलप्रमाणे मिरारोड ते चेणा विभागाकरीता **श्री. अनिल काजरोळकर** यांची बोलीची सर्वात जास्त रक्कम **रु. ८६,००,०००/-** व मुर्धा ते उत्तन विभागाकरीता **मे. बैजू कंस्ट्रक्शन** यांची बोलीची रक्कम **रु. ३,४७,०००/-** सर्वात जास्त आहे. सदर जाहीर बोलीतील जाहीर झालेली रक्कम ही महानगरपालिकेने निश्चित केलेल्या देकारापेक्षा जास्त आहेत.

तरी **मिरारोड ते चेणा** विभागाकरीता **श्री. अनिल काजरोळकर** बोली रक्कम **रु. ८६,००,०००/-** (अक्षरी रु. शहाऐंशी लाख मात्र) व **मुर्धा ते उत्तन** विभागाकरीता **मे. बैजू कंस्ट्रक्शन** बोली रक्कम **रु. ३,४७,०००/-** (अक्षरी रु. तीन लाख सत्तेचाळीस हजार मात्र) या रक्कमेस दि. ०१/०७/२००८ ते दि. ३०/०६/२००९ हया कालावधीसाठी बाजार लिलावास मंजूरी देण्यांत येत आहे.

**शानू गोहिल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, हे अकरा महिने की, बारा महिने नक्की काय आहे?

**मिलन म्हात्रे :-**

वर तुम्ही बारा बोलता मग इकडे सहा कसे? सात पाहिजेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यामध्ये आत्ता मा. आयुक्त साहेबांनी जी सुचना केली, ती तुम्ही याच्यात ॲड करा. पुढील ठेका आपण रोडवाईज किंवा छोट्या प्रमाणात असा ठरावामध्ये उल्लेख करा. यानंतर आपण जे ठेके देणार ते दोन दोन, तीन तीन रोड किंवा छोट्या प्रमाणात क्षेत्र करून आणि एकदम चेना ते उत्तन किंवा भाईंदर (पुर्व) आणि भाईंदर (वेस्ट) असे देणार नाही. असे आत्ता साहेब बोलले.

**एस. ए. खान :-**

पण ती रक्कम कमी करावी लागेल.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची सुचना याच्यावर सही करून लिहून द्या. सुचना समाविष्ट करून घेतील. सचिव साहेब, सदर ठराव सुचनांसह वाचून कायम करून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रकरण क्र. २३, मुळ ठरावामध्ये आमची सुचना समाविष्ट करून घेणे. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन विभागाकरीता १२ महिन्यांच्या कालावधीसाठी बाजार फी वसूली करीता अभिकर्ता नेमणे करीता अनुक्रमे देकाराची रक्कम रु. ८५,६२,०७०/- व रु. ३,३८,८००/- निश्चित करण्यांत आलेली होती. पण प्रत्यक्ष रक्कम बघता या भागातील वाढीव रस्ते प्रशासनाकडुन घेतले गेले नाही. ज्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तरी या नंतर महानगरपालिका क्षेत्रातील बाजार लिलाव कींव्हा निविदा मागविताना रोड प्रमाणे व छोटया स्वरुपाचे झोन करुन निविदा कींव्हा लिलाव करावा अशी सुचना मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नसावे लिहू नका. नाहीत लिहा. नसावे म्हणजे संशय, प्रश्नचिन्ह आहे. नाहित लिहा. तुमची सुचना आहे ती ठाम पाहिजे की अमुक अमुक तीन रस्ते घेतलेले नाहीत.

**नगरसचिव :-**

ठरावाचे वाचन करतो. सुचक :- श्री. मिलन म्हात्रे, अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल यांनी जो ठराव दिला त्याचे मी वाचन करतो. मा. आयुक्त सो. यांचा विषयासंदर्भातील गोषवारा वाचन करण्यांत आला.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरा रोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन या विभागाकरीता १२ महिने कालावधीसाठी बाजार फी वसूली करीता अभिकर्ता नेमणे बाबत दि. ०६/०६/२००८ च्या दै. सामना, लोकनायक व आपला महानगर या वृत्तपत्रात बोली पद्धतीने लिलावाची जाहिर नोटीस प्रसिद्ध करुन दि. १६/०६/२००८ रोजी मा. आयुक्त सो. यांचे दालनात खालीलप्रमाणे लिलाव घेण्यांत आले.

**<u>मिरारोड ते चेणा विभाग</u>** **(देकाराची रक्कम रु. ८५,६२,०७०/-)**

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नाव | पुकारलेली बोलीची रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा | ८५,७०,०००/- |
| २ | श्री. अतूल ठाकुर | ८५,७५,०००/- |
| ३ | मे. ललित कंस्ट्रक्शन (श्री. संजय पाटील) | ८५,७७,०००/- |
| ४ | मे. राज कंस्ट्रक्शन (श्री. प्रेम चौहाण) | ८५,७८,०००/- |
| ५ | श्री. शरद दहेरेकर | ८५,९०,०००/- |
| ६ | मे. बैजू कंस्ट्रक्शन (श्री. ब्रायन फोन्सेका) | ८५,९५,०००/- |
| ७ | मे. शिवम इंटरप्रायजेस (श्री. समीर व्ही. साकलकर) | ८५,९८,०००/- |
| ८ | श्री. अनिल काजरोळकर | ८६,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. राजेश तुलसीदास बेलानी | बोली लावली नाही |
| १० | मे. संकल्प ट्रेडींग कंपनी (श्री. अे. आर चौधरी) | बोली लावली नाही |

**मुर्धा ते उत्तन विभाग** **(देकाराची रक्कम रु. ३,३८,८००/-)**

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नाव | पुकारलेली बोलीची रक्कम |
|---|---|---|
| १ | मे. ललित कंस्ट्रशक्शन (श्री. संजय पाटील) | ३,४०,०००/- |
| २ | मे. संकल्प ट्रेडिंग कंपनी (श्री. अे. आर. चौधरी) | ३,४१,०००/- |
| ३ | श्री. सायमन अल्मेडा | ३,४२,०००/- |
| ४ | श्री. ललित जूगलकिशोर जोशी | ३,४४,०००/- |
| ५ | मे. शिवशक्ती ट्रान्सपोर्ट (श्री. स. का. आव्हाड) | ३,४५,०००/- |
| ६ | श्री. अनिल काजरोळकर | ३,४६,०००/- |
| ७ | मे. बैजू कंस्ट्रक्शन (श्री. ब्रायन फोन्सेका) | ३,४७,०००/- |

वरीलप्रमाणे मिरारोड ते चेणा विभागाकरीता **श्री. अनिल काजरोळकर** यांची बोलीची सर्वात जास्त रक्कम **रु. ८६,००,०००/-** व मुर्धा ते उत्तन विभागाकरीता **मे. बैजू कंस्ट्रक्शन** यांची बोलीची रक्कम **रु. ३,४७,०००/-** सर्वात जास्त आहे. सदर जाहीर बोलीतील जाहीर झालेली रक्कम ही महानगरपालिकेने निश्चित केलेल्या देकारापेक्षा जास्त आहेत.

तरी **मिरारोड ते चेणा** विभागाकरीता **श्री. अनिल काजरोळकर** बोली रक्कम **रु. ८६,००,०००/-** (अक्षरी रु. शहाऐंशी लाख मात्र) व **मुर्धा ते उत्तन** विभागाकरीता **मे. बैजू कंस्ट्रक्शन** बोली रक्कम **रु. ३,४७,०००/-** (अक्षरी रु. तीन लाख सत्तेचाळीस हजार मात्र) या रक्कमेस दि. ०१/०७/२००८ ते दि. ३०/०६/२००९ हया कालावधीसाठी बाजार लिलावास मंजूरी देण्यांत येत आहे. उपसुचना सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल व श्री. शरद पाटील यांची आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन विभागाकरीता १२ महिन्यांच्या कालावधीसाठी बाजार फी वसूली करीता अभिकर्ता नेमणे करीता अनुक्रमे देकाराची रक्कम रु. ८५,६२,०७०/- व रु. ३,३८,८००/- निश्चित करण्यांत आलेली होती. पण प्रत्यक्ष रक्कम बघता या भागातील वाढीव रस्ते प्रशासनाकडुन घेतले गेले नाही. ज्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तरी या नंतर महानगरपालिका क्षेत्रातील बाजार लिलाव कींव्हा निविदा मागविताना रोड प्रमाणे व छोटया स्वरुपाचे झोन करुन निविदा कींव्हा लिलाव करावा अशी सुचना मांडत आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. २३ सुचनांसह ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

ठराव वाचून कायम करण्यात आला.

**प्रकरण क्र. २३ :-**

मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन विभाग बाजार लिलाव (१२ महिन्यांच्या कालावधीकरीता) बोली रक्कम स्विकारणेस मंजुरी देणे.

**ठराव क्र. २१ :-**

मा. आयुक्त सो. यांचा विषयासंदर्भातील गोषवारा वाचन करण्यांत आला.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरा रोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन या विभागाकरीता १२ महिने कालावधीसाठी बाजार फी वसूली करीता अभिकर्ता नेमणे बाबत दि. ०६/०६/२००८ च्या दै. सामना, लोकनायक व आपला महानगर या वृत्तपत्रात बोली पद्धतीने लिलावाची जाहिर नोटीस प्रसिद्ध करुन दि. १६/०६/२००८ रोजी मा. आयुक्त सो. यांचे दालनात खालीलप्रमाणे लिलाव घेण्यांत आले.

**मिरारोड ते चेणा विभाग** **(देकाराची रक्कम रु. ८५,६२,०७०/-)**

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नाव | पुकारलेली बोलीची रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा | ८५,७०,०००/- |
| २ | श्री. अतूल ठाकुर | ८५,७५,०००/- |
| ३ | मे. ललित कंस्ट्रक्शन (श्री. संजय पाटील) | ८५,७७,०००/- |
| ४ | मे. राज कंस्ट्रक्शन (श्री. प्रेम चौहाण) | ८५,७८,०००/- |
| ५ | श्री. शरद दहेरेकर | ८५,९०,०००/- |
| ६ | मे. बैजू कंस्ट्रक्शन (श्री. ब्रायन फोन्सेका) | ८५,९५,०००/- |
| ७ | मे. शिवम इंटरप्रायजेस (श्री. समीर व्ही. साकलकर) | ८५,९८,०००/- |
| ८ | श्री. अनिल काजरोळकर | ८६,००,०००/- |
| ९ | श्री. राजेश तुलसीदास बेलानी | बोली लावली नाही |
| १० | मे. संकल्प ट्रेडींग कंपनी (श्री. अे. आर चौधरी) | बोली लावली नाही |

<u>मुर्धा ते उत्तन विभाग</u> (देकाराची रक्कम रु. ३,३८,८००/-)

| अ.क्र. | लिलाव धारकाचे नाव | पुकारलेली बोलीची रक्कम |
|---|---|---|
| १ | मे. ललित कंस्ट्रशक्शन (श्री. संजय पाटील) | ३,४०,०००/- |
| २ | मे. संकल्प ट्रेडींग कंपनी (श्री. अे. आर. चौधरी) | ३,४१,०००/- |
| ३ | श्री. सायमन अल्मेडा | ३,४२,०००/- |
| ४ | श्री. ललित जूगलकिशोर जोशी | ३,४४,०००/- |
| ५ | मे. शिवशक्ती ट्रान्सपोर्ट (श्री. स. का. आव्हाड) | ३,४५,०००/- |
| ६ | श्री. अनिल काजरोळकर | ३,४६,०००/- |
| ७ | मे. बैजू कंस्ट्रक्शन (श्री. ब्रायन फोन्सेका) | ३,४७,०००/- |

वरीलप्रमाणे मिरारोड ते चेणा विभागाकरीता **श्री. अनिल काजरोळकर** यांची बोलीची सर्वात जास्त रक्कम **रु. ८६,००,०००/-** व मुर्धा ते उत्तन विभागाकरीता **मे. बैजू कंस्ट्रक्शन** यांची बोलीची रक्कम **रु. ३,४७,०००/-** सर्वात जास्त आहे. सदर जाहीर बोलीतील जाहीर झालेली रक्कम ही महानगरपालिकेने निश्चित केलेल्या देकारापेक्षा जास्त आहेत.

तरी **मिरारोड ते चेणा** विभागाकरीता **श्री. अनिल काजरोळकर** बोली रक्कम **रु. ८६,००,०००/-** (अक्षरी रु. शहाऐंशी लाख मात्र) व **मुर्धा ते उत्तन** विभागाकरीता **मे. बैजू कंस्ट्रक्शन** बोली रक्कम **रु. ३,४७,०००/-** (अक्षरी रु. तीन लाख सत्तेचाळीस हजार मात्र) या रक्कमेस दि. ०१/०७/२००८ ते दि. ३०/०६/२००९ हया कालावधीसाठी बाजार लिलावास मंजूरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे** **अनुमोदक :- सौ. शानु गोहिल**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. ओमप्रकाश अग्रवाल व अनुमोदक श्री. शरद पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन विभागाकरीता १२ महिन्यांच्या कालावधीसाठी बाजार फी वसूली करीता अभिकर्ता नेमणे करीता अनुक्रमे देकाराची रक्कम रु. ८५,६२,०७०/- व रु. ३,३८,८००/- निश्चित करण्यांत आलेली होती. पण प्रत्यक्ष रक्कम बघता या भागातील वाढीव रस्ते प्रशासनाकडुन घेतले गेले नाही. ज्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तरी या नंतर महानगरपालिका क्षेत्रातील बाजार लिलाव कींव्हा निविदा मागविताना रोड प्रमाणे व छोटया स्वरुपाचे झोन करुन निविदा कींव्हा लिलाव करावा अशी सुचना मांडत आहे.

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**
**सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा-भाईदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २४ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्ट्रीट लाईट देखभाल व दुरूस्ती करणे कामांस व वार्षिक मुदतीचा ठेका निश्चित करण्याकरिता निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, रविग्रुप मध्ये जो आपला एरिया आहे. तिथे बिल्डरने फ्लॅट वगैरे विकण्यासाठी पोल लावलेले होते आणि अजुन आहेत. त्याच्यामध्ये काही पोल बंद आहेत. आपण याची तक्रार केली तर ते म्हणतात की, खाजगी आहे. आता लोक भरायला लागले. त्या बिल्डींगचे टॅक्स व असेसमेंट केलेले आहे. तिकडे त्यांची तक्रार आहे की, स्ट्रीट लाईटचे पोल रात्रीचे चालू होत नाहीत. तर त्याचा याच्यामध्ये समावेश करून जे काही बिघडलेले असतील तर.....

**मा. आयुक्त :-**

पब्लिक रोड असेल तर करता येईल.

**एस. ए. खान :-**

पब्लिक रोडच आहे. आपण रिपेअरिंग करतो. आपण रस्ता डांबरीकरण केला आहे. रस्ता डांबरीकरण करतो आणि सांगतो की, पोल प्रायव्हेट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये तुम्ही फायनल त्यांच्या खर्चाने करून घ्या आणि मग त्यांच्याकडून हॅन्ड ओव्हर करा.

**एस. ए. खान :-**

जास्त रिपेअरींग नाही.

**मा. आयुक्त :-**

करून घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

रवि ग्रुप आणि घर हो तो ऐसा आहे. जे काही असेल ते करून टाका.

**एस. ए. खान :-**

त्याचे नाही दुसऱ्याचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कोण असेल तो. नोटीस काढली की, सगळे बरोबर येतात.

**एस. ए. खान :-**

नोटीस पण काढत नाहीत आणि नुसते बोलतात.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान साहेब, वो रोड अपने महानगरपालिका को जब हॅन्ड ओव्हर करेंगे....

**एस. ए. खान :-**

साहेब, हॅन्ड ओव्हर केला आपण डांबरीकरण केलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

श्री. खान साहब, साहब बोला ना तो कर लेंगे।

**तुळशीदास म्हात्रे :-**

हे रस्ते ताब्यात देतील, त्याच्यानंतर आपण लाईट लावणार. तोपर्यंत लोकांना साप चावणार. हे बघा असे काही करू नका. मी याच्यापलिकडचे तुम्हाला सांगतो. हे जे मोठे बिल्डर आहे हे हस्तांतर करत नाहीत म्हणून यांची जी कामे चाललेली असतील, त्यांचे जे प्लॅन तुम्ही पास करता त्यांच्यावर तुम्ही बंदी आणा पहिला रस्ते करून रस्ते ताब्यात द्या. आपल्या हातात चाव्या असताना आपल्याला त्याच्यावर अवलंबून शहराची गरज आहे का? त्यांची परमिशन देणे बंद करा. पाणी कनेक्शन बंद करा. लोक राहायला आल्यानंतर तुम्ही त्यांना वेठीस धरणार हे चालणार नाही.

**एस. ए. खान :-**

रस्ता त्यांच्याकडून करून घ्या. पण लाईटमुळे नागरिकांना रात्रीचा त्रास होतो. याच्यामध्ये थोडीशी तुटफुट आहे. हे सगळे बिल्डर आत्ता निघून जातील.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, मागे आपली ठरावात चर्चा झाली की, प्रायव्हेट गृहसंकुलात ज्या मोठ्यामोठ्या बिल्डींग आहेत, त्यांचा जो इंटरनल इन्फ्रास्ट्रकचर आहे, गटार, रस्ते वगैरे हे सगळे त्यांनी बनवून तुमच्या ताब्यात द्यायचे आहे. असे असताना त्यांच्या म्हणण्यानुसार आपल्याकडून डांबरीकरण का चालते?

**प्रशांत पालांडे :-**

मा. आयुक्त साहेब, बऱ्याच लोकांच्या तक्रारी येतात की, बल्बचा प्रकाश कमी असतो. किती व्होल्टेजचे दिवे असतात आणि आपण त्याच्यामध्ये चेंज करतो का?

**मिलन म्हात्रे :-**

मेन मुद्दा बाजुला राहतो, तुम्ही रोड ताब्यात घेताना अप टू डेट रोड का घेत नाहीत? पहिल्यांदा त्याचे काहीतरी डिसिजन द्या.

**मा. आयुक्त :-**

श्री. खांबित साहेब, त्या डेव्हलपरची मिटींग लावा आणि त्या मिटींगच्या आधी आपला जे.ई. पाठवून ह्या सगळ्या गोष्टी बघा की, किती पोल आहेत? किती नाले आहेत? किती रस्ता आहे? आपण त्याला दोन पर्याय ठेवू. एकतर सुस्थितीत रस्ता करून आमच्या ताब्यात दे. नाही तर लोकांचा मोर्चा आम्ही तुझ्याकडे पाठवतो.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्या अगोदर ताबा पावती घ्यायचीच नाही. ताबा पावती घेतली की, विषय संपला.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

त्याची दुरूस्ती हाते ते जुने बल्ब काढून पिवळे बल्ब लावतात. ते काय आहे. त्याचा प्रकाश कमी येतो.

**दिपक खांबित :-**

मॅडम, हे दोन विषय आहेत. आपल्याइकडे रिलायन्सचे दहा हजार चारशे अडतीस पोल आहेत आणि जिथे रिलायन्स लावत नाही म्हणजे झोपडपट्टीमध्ये रिलायन्स लावत नाही किंवा दहा फुटापेक्षा कमी रुंदीचा रस्ता जिकडे आहे, तिकडे रिलायन्स कंपनी त्यांच्या ॲप्रामेंट लावत नाहीत. तिकडे आपण जवळपास २०७२ पोल बसवले आहेत. ते दुरुस्ती वगैरे कशी करायची त्याबद्दल आम्ही विषय आणला आहे. तुम्ही जे म्हणता, तुमचे जे दोन मुद्दे आहेत ते रिलायन्सचे आहेत. ते रिलायन्सला आपण सांगितल्यावर ते लगेच करतात.

आपल्या सुचनेनुसार ते लगेच करतात. असे कुठे असेल तर तुम्ही प्रस्ताव द्या आम्ही लगेच रिलायन्सला कळवतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मग तुम्ही तसे रिलायन्सला कळवा. माझ्या वॉर्डमध्ये सगळे सफेद बल्ब काढले आणि पिवळे बल्ब लावले आहेत.

**दिपक खांबित :-**

मग काय करायचे? सोडीयम वेपर लावायचे की, मर्क्युरी लावायचे? सोडीयम वेपर लावयचे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सोडीयम वेपर म्हणजेच पिवळे बल्ब. यांना व्हाईट पाहिजे, मर्क्युरी पाहिजे.

**दिपक खांबित :-**

ठिक आहे. एक प्रस्ताव पाठवतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

याच्यामध्ये माझी एक सुचना आहे. सोडीयम वेपर आणि मर्क्युरी याच्यामध्ये कोणाचे बिल कमी येते? ते बल्ब लावा. आणि त्याचा प्रकाश कसा पडतो ते पण टेस्ट करा.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, आपण आत्ता ३० लाखाचे काम देतो. बजेटमध्ये किती तरतुद आहे आणि कशासाठी तरतुद आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

वरील विषयानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध झोपडपट्टी विभाग तसेच चेना-काजूपाडा विभाग, केशवसृष्टी, मुर्धाखाडी, उत्तन-पाली-चौक इत्यादी ठिकाणी महानगरपालिकेमार्फत स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेमार्फत बसविण्यात आलेल्या स्ट्रीट लाईट पोल दुरुस्तीचा वार्षिक ठेका न देता बंद पोल व त्याच्या दुरुस्तीबाबत दर महिन्यास पहाणी करुन व त्याचे अंदाजपत्रक करुन प्रशासनाने वेळोवेळी योग्य ती कार्यवाही करावी.

**टेरी परेरा :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

काय ठराव झाला?

**मा. आयुक्त :-**

मी थोडक्यात सांगतो. आपले जवळपास दोन हजार पोल आहेत. त्या दोन हजार पोलसाठी दर महिन्याला एकशे वीस रुपये किंवा एकशे पंचविस रुपये दर वर्षासाठी तीन हजार रुपये. असा आपण गुणिले करुन हा फिगर काढला. सगळेच पोल दरवेळेस बंद पडतात असे नाही. सगळ्याच पोलच्या लाईट जातात असे नाही. म्हणून आपण असा रिवाईज प्रस्ताव समिती समोर ठेवतो आहेत की, दर महिन्याच्या एक तारखेपासून तीस-एकतीस तारखेपर्यंत ज्या काही तक्रारी येतील त्या एकत्र करायच्या. एक तारखेला त्या आलेल्या तक्रारीवरुन खात्री करुन तेवढ्याचे एक शॉर्ट पीस मिल काम करायचे. तसेच बारा महिन्याची बारा कामे करायची. जे नक्कीच एकोणतीस पेक्षा पाच-दहा लाख रुपये त्याच्यात वाचतील अशी अपेक्षा आहे आणि हे एक्सपेरीमेन्ट बेसीस आहे. आत्ता यावर्षी जर आपल्याला त्याच्यात पाच-दहा लाख रुपये वाचवता आले तर दरवर्षी आपण तसेच करु असे काही करायची गरज नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्याच्यामध्ये माझे सजेशन असे आहे की, तुम्ही जे एक ते तीस तारीख करणार ते एक ते पंधरा तारीख करा. कारण साहेब, एक पोल जर एक तारखेला बंद झाला. तर तो पोल दुसऱ्या महिन्यामध्ये चालू होईल.

**मा. आयुक्त :-**

तीस दिवस जास्त होतील हे मला मान्य आहे. तरी पंधरा-पंधरा दिवसांसाठी बारा दुणे चोविस कामे करावी लागतील. आपण पहिल्या महिन्यात किती तक्रारी येतात हे बघू. फारच मोठे प्रमाण असेल मग तसे करु.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, शहरामध्ये त्याचे चार भाग करा. एक भाईंदर पूर्व-पश्चिम जर असतील, म्हणजे चौथ्यातला काही अर्थ नाही. तुम्ही चार भाग करा. चार भागामध्ये एक-एक आठवड्यात ड्राईव्ह घ्या. कारण आपले मरण असे आहे की, रिलायन्स लावल्यामुळे आपण बिल तर सगळे भरतो पण बत्त्या बंद असतात. आणि या खाजगी पण तोच प्रकार आहे. खाजगीमध्येसुध्दा आपला विजीलन्सवाला माणूस चेकिंगला आहे. तो आमच्याकडून सह्या घेतो. निदान मी तरी त्याला रजिस्टरवर सह्या देतो. बाकीच्यांचे मला माहिती नाही. पण त्याच्या नंतरसुध्दा चार-चार आठवडे, एक आठवडा, दोन आठवडे रिपेअरिंग होत नाही. तुम्ही जे एक महिन्याचे बोलतात तो आठवड्याचा गॅप करा. कारण लाईटचे आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण पंधरा दिवसात करु.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे पंधरा दिवस बंद राहिले तर चालेल? मी आठवडा मागतो. साहेब, आठवड्याचे घ्या. तर ते पंधरा दिवसात होईल. नाहीतर पंधरा दिवस दिले तर दोन महिने लागणार.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे साहेब, माझा दुसरा प्रस्ताव आहे. आपण महिनाभर वाट बघून नंतर साहित्य घेण्यापेक्षा मी असे प्रस्तावित करतो की, आपण इन ॲडवान्स स्टोअरमध्ये काही ठेवू आणि मग लागेल त्याप्रमाणे ती इन्वेन्टरी जाईल. त्याचा हिशोब राहिल. म्हणजे ॲडवान्स परचेस करुन पाच ते दहा टक्के ठेवू.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण साहेब, तो रिपेअरिंग करणार माणूस आपल्या महानगरपालिकेत नसेल. तुम्ही इन्वेन्टरी आणणार पण तो पोल उभा करणे, त्याला जो लेबर लागेल तो नसेल.

**मा. आयुक्त :-**

हे जे दोन हजार पोल आहेत, ते आपणच उभे केलेले आहेत. त्यामुळे ज्याअर्थी त्यांनी स्वतः पोल उभे केले आणि मेन्टेन करतात. त्याअर्थी मशिनरी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण साहेब, कॉन्ट्रॅक्टरकडूनच उभे केले आहेत. आपण स्वतः उभे केलेले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे, जरी कॉन्टॅक्टरमार्फत उभे केले असेल तर ते असे झाले की, कॉन्ट्रॅक्टरने एखादी गोष्ट घेतली की, कॉन्ट्रॅक्टर किंवा ती गोष्ट दोघांपैकी एक मरेपर्यंत ते सेम राहतील असा त्याचा अर्थ होतो. आपण प्रयत्न करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, याच्यामध्ये एक सुचना आहे. आमच्या प्रभागामध्ये एक झोपडपट्टी आहे. जिकडे ताकद लागते तिकडे लावतात. ही वीस वर्षाची झोपडपट्टी आहे. तिकडे स्ट्रीट लाईट लावली नाही. आत्ता आम्ही प्रापोजल दिलेले आहे. आयुक्त साहेब, बघणार मग ज्या झोपडपट्टीमध्ये असे पोल नसतील, जिकडे आवश्यकता असेल तिकडे तुम्ही मान्यता द्यावी.

**मा. आयुक्त :-**

मलाही आश्चर्य वाटते की, जर वीस वर्षापासून तिथे लोक राहतात आणि आजपर्यंत पोल नाहीत हे कसे शक्य आहे. मला ते क्युरियोसिटी पोटी बघायचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमच्या दोन झोपडपट्टी आहेत. साईबाब आणि हनुमान झोपडपट्टीमध्ये सर्व्हे करुन आले. ते मला बोलले की, साहेबांची मंजुरी घ्यावी लागेल, म्हणून तुम्हांला सांगतो. साहेब, आत्ता आपण जी रिलायन्सची पॉवर घेतो. त्यामध्ये रिलायन्समुळे काही गडबड झाली असेल तर तसे त्यांच्याकडून करा. ते आपल्यामध्ये समाविष्ठ करु नका. केबल पार्ट लावला तो रिलायन्सचा आहे. फक्त पोल आपला आहे. पोल आणि बल्ब आपला आहे.

**दिपक खांबित :-**

ते पोल पूर्ण आपले आहेत. फक्त रिलायन्सचे मीटर रिलायन्सचे कनेक्शन घेतले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कनेक्शन कशामध्ये घेतले?

**मा. आयुक्त :-**

हा चांगला मुद्दा आहे. जर शहरातील दहा हजार पोल त्यांचे असतील आणि दोनच हजार आपले असतील. उभा करेपर्यंत ठिक आहेक. ते तिकडे जात नाहीत. पण एकदा उभा केल्यावर ते त्यांच्या ताब्यात देउन टाका. शक्य आहे का?

**दिपक खांबित :-**

नाही.

**मा. आयुक्त :-**

का नाही? त्यांची गाडी तिथे मेन्टेनन्सला जात नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाहीतर उद्या केबल फॉल्ट नसेल आणि आपण टेंडर काढू आणि त्यांचा केबल फॉल्ट त्याला आहे. असे नाही झाले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

हे फक्त पोल आणि पोलचा बल्ब एवढ्या पुरतेच मर्यादित आहे.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, मला एक बोलायचे आहे. मगाशी सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान साहेब बोलले तसेच आहे. काही मोठे-मोठे ले-आउट आहेत. त्याच्यामध्ये तीन-चार फेडरेशन्स वसलेली आहेत. त्याच्यामधून जे रस्ते जातात, तिथे आपले पोल अजूनही लागलेले नाहीत. सुंदर साईधाम, विजय बागच्या बाजूला वगैरे आहे. वेगवेगळी आहे. त्याच्यामध्ये वर्षानुवर्षे लोक अंधारात राहतात. कारणे हीच की, ते हॅन्डओव्हर नाही.

**मा. आयुक्त :-**

हॅन्डओव्हर केल्यास शक्य आहे.

**प्रशांत पालांडे :-**

कोण हॅन्डओव्हर करणार? वेगवेगळ्या फेडरेशन्स आहेत.

**दिपक खांबित :-**

फेडरेशनवाले देत नाहीत.

**प्रशांत पालांडे :-**

पण तिथे फेडरेशन्स पण वेगवेगळी आहेत. एकच फेडरेशन असते तर वेगळी गोष्ट आहे. विजय पार्क, सुंदर साईधाम वगैरे एरिया आहे.

**दिपक खांबित :-**

नावे द्या. आपण साहेबांकडे मिटींग बोलवू.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. २४, ठराव वाचून मंजुर करण्यात आला.

**प्रकरण क्र. २४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्ट्रीट लाईट देखभाल व दुरूस्ती करणे कामांस व वार्षिक मुदतीचा ठेका निश्चित करण्याकरिता निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. २२ :-**

वरील विषयानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध झोपडपट्टी विभाग तसेच चेना-काजूपाडा विभाग, केशवसृष्टी, मुर्धाखाडी, उत्तन-पाली-चौक इत्यादी ठिकाणी महानगरपालिकेमार्फत स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेमार्फत बसविण्यात आलेल्या स्ट्रीट लाईट पोल दुरुस्तीचा वार्षिक ठेका न देता बंद पोल व त्याच्या दुरुस्तीबाबत दर महिन्यास पहाणी करुन व त्याचे अंदाजपत्रक करुन प्रशासनाने वेळोवेळी योग्य ती कार्यवाही करावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. टेरी परेरा**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा-भाईदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २५, निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग)

**एस. ए. खान :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खाजगी करणामार्फत गट निहाय प्रभाग साफसफाई कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदाकारांनी दि. ४/६/२००८ रोजी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे महानगरपालिकेच्या विरोधात दावा क्र. RCS. NO - 379/2008 नुसार दावा दाखल केला होता. त्यानुसार या दाव्यास मा. न्यायालयाने जैसेथे स्थगिती आदेश देताना पुढील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

१) महापालिकेच्या वतीने वॉर्ड साफसफाई कामाच्या कोणत्याही निविदा नव्याने काढण्यात येउ नये.
२) निविदा भरलेल्या निविदाकारा व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेस नव्याने काम देण्यात येउ नये.

साफसफाईचे काम अत्यावश्यक बाब असल्याने त्यावर निर्णय घेणे आवश्यक होते. संबधीत निविदाकारांना मा. आयुक्त यांच्या दालनामध्ये दि. १३/६/२००८ रोजी निविदेतील दर कमी करणेबाबत वाटाघाटीस बोलविले होते. निविदाकारांनी सरासरी २५ ते ७५**%** जादा दराने निविदा सादर केल्या होत्या. गट क्र. ०१ ते १६, १८ व १९ करिता २६.५०% जादा दराने व गट क्र. १७ करिता २५% जादा दराने काम करण्यास निविदाकारांनी लेखी संमती दिलेली आहे व जादा दराचा खुलासा खालीलप्रमाणे केला आहे.

१) प्रचलित किमान कामगार वेतन कायद्यानुसार कामागारांचे वेतन, प्रोविडंट फंड, घर भाडे, बोनस इत्यादी देय विविध भत्ते देणे आवश्यक आहे.

२) शहरात जमा होणारा कचरा १० ते १५ कि.मी. अंतरावर खत प्रकल्प ठिकाणी वाहतुक करणे तसेच मागील वर्षाच्या तुलनेत इंधन खर्चात प्रति लिटर ४ ते ५ रुपायाने वाढ झालेली आहे. भविष्यात सुध्दा वाढ होण्याची शक्यता गृहीत धरून सदरची वाढ केली आहे.
३) वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्च २.८०%
४) आयकर कपात खर्च २.२४%
५) वाढती महागाई लक्षात घेवून वार्षिक साहित्य वस्तु खर्च ५%

सदरचे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने मा. न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून हि सभा खालीलप्रमाणे ठराव पारीत करीत आहे. प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यानुसार गट क्र. ०१ ते १६, १८ व १९ करिता अंदाजित प्रस्तावित वार्षिक रक्कमेच्या २६.५०% जादा दराने, गट क्र. १७ करिता प्रस्तावित अंदाजित रक्कमेच्या २५% जादा दराच्या निविदांना मंजूरी देत आहे.

प्रभाग निहाय साफसफाईचे काम अत्यावश्यक बाब असल्याने सध्या कार्यरत असलेल्या निविदाकारांच्या कामांना दि. ०१/५/२००८ पासुन प्रस्तावित कामाच्या निविदाकारांना कामाचा कार्यादेश देई पर्यंत हि सभा मुदत वाढीस कार्योत्तर मंजूरी देत आहे. सदरचा ठराव वाचुन कायम करण्यात येत आहे.

**शानु गोहिल :-**

माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या प्रकरणा संबंधी काय-काय अटीशर्ती आहेत, ते मी मागवले होते. तर मला ते मिळाले आहेत. मला ज्या अटीशर्ती दिलेल्या आहेत. त्याच्यात .....

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २५ करिता आलेल्या ठरावाचे मी वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खाजगी करणामार्फत गट निहाय प्रभाग साफसफाई कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदाकारांनी दि. ४/६/२००८ रोजी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे महानगरपालिकेच्या विरोधात दावा क्र. RCS. NO - 379/2008 नुसार दावा दाखल केला होता. त्यानुसार या दाव्यास मा. न्यायालयाने जैसेथे स्थगिती आदेश देताना पुढील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

१) महापालिकेच्या वतीने वॉर्ड साफसफाई कामाच्या कोणत्याही निविदा नव्याने काढण्यात येउ नये.
२) निविदा भरलेल्या निविदाकारा व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेस नव्याने काम देण्यात येउ नये.

साफसफाईचे काम अत्यावश्यक बाब असल्याने त्यावर निर्णय घेणे आवश्यक होते. संबधीत निविदाकारांना मा. आयुक्त यांच्या दालनामध्ये दि. १३/६/२००८ रोजी निविदेतील दर कमी करणेबाबत वाटाघाटीस बोलविले होते. निविदाकारांनी सरासरी २५ ते ७५% जादा दराने निविदा सादर केल्या होत्या. गट क्र. ०१ ते १६, १८ व १९ करिता २६.५०% जादा दराने व गट क्र. १७ करिता २५% जादा दराने काम करण्यास निविदाकारांनी लेखी संमती दिलेली आहे व जादा दराचा खुलासा खालीलप्रमाणे केला आहे.

१) प्रचलित किमान कामगार वेतन कायद्यानुसार कामागारांचे वेतन, प्रोविडंट फंड, घर भाडे, बोनस इत्यादी देय विविध भत्ते देणे आवश्यक आहे.
२) शहरात जमा होणारा कचरा १० ते १५ कि.मी. अंतरावर खत प्रकल्प ठिकाणी वाहतुक करणे तसेच मागील वर्षाच्या तुलनेत इंधन खर्चात प्रति लिटर ४ ते ५ रुपायाने वाढ झालेली आहे. भविष्यात सुध्दा वाढ होण्याची शक्यता गृहीत धरून सदरची वाढ केली आहे.
३) वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्च २.८०%
४) आयकर कपात खर्च २.२४%
५) वाढती महागाई लक्षात घेवून वार्षिक साहित्य वस्तु खर्च ५%

सदरचे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने मा. न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून हि सभा खालीलप्रमाणे ठराव पारीत करीत आहे. प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यानुसार गट क्र. ०१ ते १६, १८ व १९ करिता अंदाजित प्रस्तावित वार्षिक रक्कमेच्या २६.५०% जादा दराने, गट क्र. १७ करिता प्रस्तावित अंदाजित रक्कमेच्या २५% जादा दराच्या निविदांना मंजूरी देत आहे.

प्रभाग निहाय साफसफाईचे काम अत्यावश्यक बाब असल्याने सध्या कार्यरत असलेल्या निविदाकारांच्या कामांना दि. ०१/५/२००८ पासुन प्रस्तावित कामाच्या निविदाकारांना कामाचा कार्यादेश देई पर्यंत हि सभा मुदत वाढीस कार्योत्तर मंजूरी देत आहे. सदरचा ठराव वाचुन कायम करण्यात येत आहे.

**मा. सभापती :-**

मा. न्यायालयाच्या निर्णया आधारे हा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, कोर्टाचे जे काही आहे ते आम्हांला सुध्दा द्यावे. न्यायालयाचा काय निर्णय आहे ते आम्हांला सुध्दा कळू द्या.

**प्रकरण क्र. २५ :-**

निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. २३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात खाजगी करणामार्फत गट निहाय प्रभाग साफसफाई कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदाकारांनी दि. ४/६/२००८ रोजी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे महानगरपालिकेच्या विरोधात दावा क्र. RCS. NO - 379/2008 नुसार दावा दाखल केला होता. त्यानुसार या दाव्यास मा. न्यायालयाने जैसेथे स्थगिती आदेश देताना पुढील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

१) महापालिकेच्या वतीने वॉर्ड साफसफाई कामाच्या कोणत्याही निविदा नव्याने काढण्यात येउ नये.
२) निविदा भरलेल्या निविदाकारा व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेस नव्याने काम देण्यात येउ नये.

साफसफाईचे काम अत्यावश्यक बाब असल्याने त्यावर निर्णय घेणे आवश्यक होते. संबधीत निविदाकारांना मा. आयुक्त यांच्या दालनामध्ये दि. १३/६/२००८ रोजी निविदेतील दर कमी करणेबाबत वाटाघाटीस बोलविले होते. निविदाकारांनी सरासरी २५ ते ७५**%** जादा दराने निविदा सादर केल्या होत्या. गट क्र. ०१ ते १६, १८ व १९ करिता २६.५०% जादा दराने व गट क्र. १७ करिता २५% जादा दराने काम करण्यास निविदाकारांनी लेखी संमती दिलेली आहे व जादा दराचा खुलासा खालीलप्रमाणे केला आहे.

१) प्रचलित किमान कामगार वेतन कायद्यानुसार कामागारांचे वेतन, प्रोविडंट फंड, घर भाडे, बोनस इत्यादी देय विविध भत्ते देणे आवश्यक आहे.
२) शहरात जमा होणारा कचरा १० ते १५ कि.मी. अंतरावर खत प्रकल्प ठिकाणी वाहतुक करणे तसेच मागील वर्षाच्या तुलनेत इंधन खर्चात प्रति लिटर ४ ते ५ रुपायाने वाढ झालेली आहे. भविष्यात सुध्दा वाढ होण्याची शक्यता गृहीत धरून सदरची वाढ केली आहे.
३) वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्च २.८०**%**
४) आयकर कपात खर्च २.२४**%**
५) वाढती महागाई लक्षात घेवून वार्षिक साहित्य वस्तु खर्च ५**%**

सदरचे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्याने मा. न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून हि सभा खालीलप्रमाणे ठराव पारीत करीत आहे. प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यानुसार गट क्र. ०१ ते १६, १८ व १९ करिता अंदाजित प्रस्तावित वार्षिक रक्कमेच्या २६.५०% जादा दराने, गट क्र. १७ करिता प्रस्तावित अंदाजित रक्कमेच्या २५% जादा दराच्या निविदांना मंजूरी देत आहे.

प्रभाग निहाय साफसफाईचे काम अत्यावश्यक बाब असल्याने सध्या कार्यरत असलेल्या निविदाकारांच्या कामांना दि. ०१/५/२००८ पासुन प्रस्तावित कामाच्या निविदाकारांना कामाचा कार्यादेश देई पर्यंत हि सभा मुदत वाढीस कार्योत्तर मंजूरी देत आहे. सदरचा ठराव वाचुन कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव वाचून कायम करण्यांत आला**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा-भाईदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य सन्मा. सदस्या, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यांस सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १२.४५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**